# मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा : डी. वाय. पाटील

कोल्हापूर, ता. १० : "कर्म हाच धर्म आहे, मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे," असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी आज येथे केले.

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने आयोजित भद्रकाली ताराराणी पुरस्कार वितरणप्रसंगी ते बोलत होते. ताराराणी विद्यापीठ येथे कार्यक्रम झाला.

डॉ. पाटील यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेविका सौ. सिंधूताई सपकाळ यांना 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

डॉ. पाटील म्हणाले, "प्रत्येक जण आपल्या पद्धतीने परमेश्वराला शोधत असतो. परमेश्वर सर्व ठिकाणी आहे; पण गरिबांच्यात परमेश्वर आहे, त्याच्यासाठी काम करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे."



कोल्हापुरात सोमवारी ताराराणी विद्यापीठ येथे पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते भद्रकाली ताराराणी पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ समाजसेविका सौ. सिंधूताई सपकाळ. शेजारी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील.

सत्काराला उत्तर देताना श्रीमती सपकाळ म्हणाल्या, "महाराष्ट्रात मोठे होण्यासाठी मरावे लागते. मेल्यानंतरच त्याच्या कार्याची दखल घेतली जाते, ही आजची शोकांतिका आहे."

त्या म्हणाल्या, "मुलांवर लहानपणापासूनच सुसंस्कार होणे गरजेचे आहे, तरच पिढी संस्कारित बनेल. स्त्रियांनी भविष्यात येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी सबल राहिले पाहिजे."

सौ. जयश्री पाटील, अरुण कणगलेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. श्रीमती यू. डी. इंदुलकर यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी गौरवपत्राचे वाचन केले. उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी गौरवगीत गायिले.

सकाळ 11-02-2003